# नियोजन, शिस्तबद्ध परिश्रम आणि सातत्य स्पर्धा परीक्षा मधील यशाची गुरुकिल्ली- डॉ. अमर कांबळे

"कोणत्याही परीक्षेची पूर्वतयारी म्हणजे फक्त अभ्यास नाही तर नियोजन, शिस्तबद्ध परिश्रम आणि सातत्य या घटकांचा संगम असतो. दीर्घकाळ कष्ट घेतल्यास यशही दीर्घकालीन आणि समाधानकारक मिळते. विद्यार्थ्यांनी केवळ सरकारी नोकरी म्हणूनच नव्हे, तर समाजसेवेची संधी म्हणून स्पर्धा परीक्षेकडे पाहिले पाहिजे." असे प्रतिपादन श्री अण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले येथील प्राध्यापक डॉ. अमर कांबळे यांनी केले. व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे स्पर्धा परीक्षा विभागाचे उदघाटन समारंभ प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. डॉ. अमर कांबळे हे गेल्या अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांना MPSC, UPSC, बँकिंग, रेल्वे, तलाठी, ग्रामसेवक तसेच कृषी, पाटबंधारे, पशुसंवर्धन अशा विविध विभागातील स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ आतापर्यंत असंख्य विद्यार्थ्यांनी घेतला असून अनेक विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या अभ्यासपूर्ण व्याख्यानशैलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावण्याचा सल्ला दिला. चालू घडामोडींचे ज्ञान, इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांवर प्रभुत्व, आणि आत्मविश्वासाने व्यक्त होण्याची क्षमता यांचा अभ्यासात समावेश असावा, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात रोजगार निर्मितीसाठी स्पर्धा परीक्षा हा एक उत्तम पर्याय ठरतो. बी.कॉमसारखे पारंपरिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बँकिंग, MPSC, LIC हे चांगले करिअरचे पर्याय आहेत. कुटुंबासाठी नावलौकिक मिळवायचा असेल तर कष्टाला पर्याय नाही. वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. बी. एन. कांबळे यांनीही विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, सध्याच्या स्पर्धात्मक वातावरणात टिकून राहण्यासाठी अभ्यास व वाचन या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कार्यक्रमाचे स्वागत व रूपरेषा स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख श्री डी. बी. पवार यांनी मांडली. डॉ. एस. आर. ठाकर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली, तर आभारप्रदर्शन श्री एच. व्ही. कांबळे यांनी केले. कु. मोहिनी आंचलिया यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. या कार्यक्रमास स्पर्धा परीक्षा विभाग सदस्य श्री टी. एन. मुल्ला, श्री एस. बी. मलघान, श्री गांधी यांच्यासह महाविद्यालयातील इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


श्री व्यंकटेश महाविद्यालय इचल.
स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन विभाग आयोजीत व्याख्यान
विषय- 'स्पर्धा परिक्षांची पूर्वतयारी'
प्रा. डी. बी. पवार
(विभाग प्रमुख)
Shri Venkatesh Mahavidyalaya,
सारंग दास,इचल.